# एस.आर. रंगनाथन यांचे विचार आजही ग्रंथालयशास्त्रासाठी प्रेरणादायी - श्री. एम. पी. केसरकर

" ग्रंथालय शास्त्रामध्ये एस. आर. रंगनाथन यांनी सांगितलेले पाच नियम आजही ग्रंथालयाचे व्यवस्थापन करताना उपयोगी पडतात. भारताच्या ग्रंथालय शास्त्राच्या चळवळीमध्ये रंगनाथन यांचे योगदान प्रचंड असून त्यामुळे त्यांना ग्रंथालय शास्त्राचे जनक ही पदवी देण्यात आली आहे. भारतात ही चळवळ रुजवण्याचे काम रंगनाथन यांनी केले. त्यामुळेच भारतामध्ये ग्रंथालय शास्त्राची चळवळ खोलवर रुजली आहे." असे प्रतिपादन  श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर यांनी केले. ते श्री वेंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे  एस. आर. रंगनाथन यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.  पुढे ते म्हणाले, " एस आर रंगनाथन यांचे ग्रंथालयात शास्त्रातील योगदान प्रचंड असून त्यांच्या कार्यामुळे भारतामध्ये ग्रंथालय शास्त्राचा विकास झाला. त्यांनी सांगितलेले कोलन वर्गीकरण, ग्रंथालय शास्त्राचे पाच नियम, ग्रंथालय शास्त्र विद्यालयची स्थापना तसेच वर्गीकृत कॅटलॉग कोड यामुळे भारतीय ग्रंथालय शास्त्रामध्ये अमुलाग्र बदल झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालय परिचर श्री. अजय वळवी यांनी केले .प्रमुख पाहुण्यांची ओळख ग्रंथालय परिचर श्री. शशांक कवडगे यांनी करून दिली. आभार ग्रंथालय परिचर श्री.पी.एस. माने यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

